# या सत्रकाळातील कामकाजाचा आढावा.

अध्यक्ष : या पावसाळी अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस आहे आणि आजच्या दिवसाचे कामकाज सुध्दा आता संपत आलेले आहे. मी या सत्रकाळातील ल कामकाजाचा आढावा आता सदनासमोर ठेवत आहे.

या अधिवेशनात एकूण १२ दिवस कामकाज झालेले आहे. प्रत्यक्षात झालेले कामकाज १०० तास १६ मिनिटे  असून कामकाज होऊ न शकलेला कालावधी ३ तास ३७ मिनिटे  एवढा आहे. रोजचे सरासरी कामकाज ८ तास २० मिनिटे आहे. या अधिवेशनात आपण अनेक महत्वाच्या विषयांवर विविध आयुधांच्या माध्यमातून विस्तृत चर्चा केलेली असून जनतेच्या अनेक प्रश्नांना यथोचित न्याय देण्याचा पूर्ण प्रयत्न केलेला आहे.

या अधिवेशनात एकूण प्राप्त झालेल्या तारांकित प्रश्नांची संख्या ८०२४ आहे. स्वीकृत झालेल्या तारांकित प्रश्नांची संख्या ७११ असून सभागृहात ५३ प्रश्नांची तोंडी उत्तरे देण्यात आली. एकूण प्राप्त झालेल्या अल्पसूचना प्रश्नांची संख्या ४ असून स्वीकृत झालेल्या अल्प सूचना प्रश्नांची संख्या शून्य आहे.

एकूण प्राप्त झालेल्या लक्षवेधी सूचनांची संख्या १८९० असून स्वीकृत लक्षवेधी सूचना ८० इतक्या आहेत. तर चर्चा झालेल्या लक्षवेधी सूचना ४३ आहेत.

या अधिवेशनात विधानसभेने एकूण २६ विधेयके संमत केली व दोन्ही सभागृहांनी एकूण २४ विधेयके संमत केली.

अर्धातास चर्चेच्या एकूण १७३ सूचना प्राप्त झाल्या. त्यापैकी ६८ स्वीकृत करण्यात आल्या आणि सभागृहात ३ अर्धातास चर्चेच्या सूचनांवर चर्चा झाली.

या अधिवेशनात ४ अशासकीय विधेयकांवर चर्चा झाली.

प्राप्त अशासकीय ठरावांची संख्या ३७२ असून मान्य सूचनांची संख्या २५१ आहे व चर्चा झालेल्या सूचनांची संख्या १ आहे.

नियम २९३ अन्वये ४ प्रस्तावांवर चर्चा करण्यात आली.

अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा झाली.

एका शासकीय ठरावावर चर्चा झाली.

संपूर्ण अधिवेशन कालावधीत सभागृहात माननीय सदस्यांची एकूण सरासरी उपस्थिती ७८.६४ टक्के इतकी होती. त्यात जास्तीत जास्त उपस्थिती ८८.९३ टक्के तर कमीतकमी उपस्थिती ४१.९७ टक्के एवढी होती.